# नाशिक महानगरपालिका,नाशिक

**नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील अग्निशामक विभागाकडील विविध संवर्गातील रिक्त पदे तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात पदोन्नतीने भरणेकरीता कर्मचारी निवड समितीची बैठक.**

## -: बैठकीचे इतिवृत्त :-

==========================================================================

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागाकडील उपमुख्य अग्निशामक दल अधिकारी, स्टेशन ऑफीसर, सब ऑफीसर, लिडींग फायरमन या पदनामाचे रिक्त पदे तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात पदोन्नतीने भरणेबाबत कर्मचारी निवड समितीची बैठक दिनांक २१/११/२०१२ रोजी दुपारी ठिक ३.३० वाजता मा. आयुक्त सो. नाशिक महानगरपालिका नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील प्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. आयुक्त सो., | :- | अध्यक्ष |
| २. | उपआयुक्त (प्र.) | :- | सदस्य |
| ३. | मुख्य अग्निशामक दल अधिकारी | :- | सदस्य |
| ४. | क्रिडा अधिकारी तथा मागासवर्गीय अधिकारी | :- | सदस्य |
| ५. | मुख्यलेखापरीक्षक | :- | सदस्य |
| ६. | कामगार कल्याण अधिकारी | :- | पदसिध्द सचिव |

सदर बैठकीसाठी कोरम पुर्ण झाल्याने दुपारी ०४ : ०० वाजता कर्मचारी निवड समितीचे कामकाजास सुरवात झाली. बैठकीत खालीलप्रमाणे विषयांवर चर्चा झाली. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त पदे भरतांना खालीलप्रमाणे सर्वसाधारण नियमावलीचा अवलंब करण्याबाबत समिती सदस्यांमध्ये सहमती झाली.

१) नाशिक महानगरपालिकेने सन २००९ मध्ये केलेल्या नविन सेवाप्रवेश नियमांना अद्याप मा.शासनाची मान्यता मिळालेली नसल्याने व वर्ग १ व २ ची अनुशेष बिंदु नामावली/रोष्टर रजिष्टर अद्याप शासनाकडुन प्रमाणित करुन मिळालेली नसल्याने आगामी सिंहस्थ कुंभमेळयाचे कामे तत्परतेने करणेसाठी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील तांत्रिक/अतांत्रिक संवर्गातील सर्व संवर्गातील रिक्त पदे १००% पदोन्नती या तत्वावर तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात भरणेस मा.महासभा ठराव क्रमांक ३२७ दिनांक १८/१०/२०१२ अन्वये शिफारस करण्यात आलेली आहे त्यानुसार रिक्त पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना १००% पदोन्नती तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात देण्यात यावी अशी समितीने शिफारस केली.

२) महानगरपालिकेच्या प्रचलित सेवाप्रवेश नियमानुसार विहीत केलेली अनुभवाची अट ऐवजी शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०८८/१०९/बारा, सामान्य प्रशासन विभाग दि.२५ ऑगस्ट १९८८ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२००५/प्र.क.१/२००५/१२,सामान्य प्रशासन विभाग दि.२५ फेब्रुवारी २००५ मधील तरतुदीनुसार निम्न पदावर ३ वर्षांच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठीची पुर्व अट म्हणुन विहीत करण्यास समितीने शिफारस केली.

३) पदोन्नतीकरिता विहीत शैक्षणिक अर्हतेमध्ये कोणत्याही प्रकारची शिथीलता देण्यात येऊ नये, मात्र भुतपुर्व नगरपालिकेतील नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिका ठराव नं.७५ दिनांक २१/६/१९८५ च्या ३ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक अर्हतेमध्ये शिथीलता देण्यात यावी.

४) अधिकारी/कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी चांगली आहे या धारणेच्या अधिन राहुन सदर तदर्थ (Ad-hoc) पदोन्नती देण्यात येतील यास्तव पदोन्नती दिल्यानंतर अधिकारी/कर्मचारी यांचे वर्तनाबाबत प्रतिकूल शेरा प्राप्त झाल्यास त्यानुसार सदर अधिकारी/कर्मचारी यांची पदोन्नती रदद करण्यात येईल.

५) अनुशेषाबाबत मागासवर्गीय दक्षता कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय/मा.शासनाकडुन बिंदु नामावली तपासतांना काही त्रुटी आढळुन आल्यास अगर पदोन्नतीबाबत काही वस्तुनिष्ठ आक्षेप प्राप्त झाल्यास त्याबाबत घेण्यात आलेला निर्णय पदोन्नत झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना बंधनकारक राहील.तसेच सदर तदर्थ (Ad-hoc) पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता यादी त्या संवर्गात कार्यरत नियमित

कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त स्वंतत्रपणे दर्शविण्यात यावी जेणेकरुन त्यासंवर्गात कार्यरत नियमित कर्मचाऱ्यांचे सेवाजेष्ठता यादीत कोणताही बदल होणार नाही.

६) सदर तदर्थ (Ad-hoc) पदोन्नत्या हया, पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना जेष्ठ असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या/ कर्मचाऱ्यांच्या व ज्यांची प्रकरणे विचारार्थ खुली ठेवण्यात आलेली आहेत अशा अधिकाऱ्यांच्या/ कर्मचाऱ्यांच्या जेष्ठतेस बाधा न येण्याच्या अटीच्या अधिन राहुन देण्यात येतील.

७) नाशिक महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या सेवाप्रवेश नियमांना/त्यामध्ये होणाऱ्या बदलांना शासनाची मान्यता मिळण्याचे अधिन राहुन सदर पदोन्नती देण्यात येणार असल्याने पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना ते नियमित पदोन्नतीस पात्र आहेत असा त्याचा अर्थ होत नाही व या तदर्थ (Ad-hoc) स्वरुपातील पदोन्नतीमुळे नियमित पदोन्नतीचे कोणतेही हक्क त्यांना प्राप्त होणार नाहीत.

८) सदर तदर्थ (Ad-hoc) पदोन्नती नियमित कोटयातील रिक्त पदांवर तसेच सरळसेवा प्रविष्टांच्या कोटयातील रिक्त पदांवर देण्यात येणार असल्याने जसेजसे सरळसेवा प्रविष्ट उमेदवार उपलब्ध होतील तेव्हा तसेच भविष्यात अन्य कारणास्तव पदावनत करण्याची आवश्यकता भासल्यास तेव्हा कोणतीही नोटीस न देता कनिष्ठतम अधिकाऱ्यांना शेवटच्यास प्रथम (last come first go) याप्रमाणे पदावनत करण्यात येईल.

९) मागास प्रवर्गातील पदोन्नती मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांनी जात वैधताप्रमाणपत्र सादर केले नसल्यास त्यांनी ३ महिन्यांचे आंत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडील जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील अन्यथ: त्यांना त्यांचे मुळ पदावर पदावनत करण्यात येईल.

१०) उपरोक्तप्रमाणे पदोन्नतीसाठी पात्र होणाऱ्या कर्मचारी/अधिका-यांपैकी ज्या अधिकारी/कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात आलेला असेल अशा कर्मचाऱ्यांना केवळ कार्यात्मक पदोन्नती (Functional Promotion) देय राहील.

११) ज्या पदांकरिता निम्नश्रेणीतील संवर्गातुन पदोन्नतीकरिता कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत अशा पदांवर सरळसेवा भरतीव्दारे नियुक्ती करण्यात यावी असा समितीने निर्णय घेतला.

**विषय क्रमांक** १ -: उपमुख्य अग्निशमन दल अधिकारी या संवर्गात निम्नश्रेणी फायर ऑफिसर या संवर्गातुन पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणे.

**पदोन्नतीचे पदनाम** :- **उपमुख्य अग्निशमन दल अधिकारी**

वेतनश्रेणी :- ९३००-३४८००+४४०० ग्रेड वेतन

अ) एकुण मंजुर पदे :- १

ब) भरलेली पदे :- -

क) रिक्त पदे :- १

एकुण रिक्त पदे :- १

**पदोन्नतीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव खालिलप्रमाणे.**

१) एस.एस.सी परिक्षा (रसायन शास्त्र व भौतिक शास्त्र) यापैकी एक विषय घेऊन उत्तीर्ण

२) सलग १० वर्ष स्टेशन ऑफिसर या पदाचा काम केल्याचा अनुभव.

३) नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज नागपुर येथील किंवा तत्सम मान्यता प्राप्त संस्थेचा फायर ऑफिसर कोर्स उत्तीर्ण

**उपमुख्य अग्निशमन दल अधिकारी या संवर्गात पदोन्नतीकरिता रिक्त पदांची स्थिती खालिलप्रमाणे..**

<table>
<tr><th rowspan="2"></th><th rowspan="2">अजा</th><th rowspan="2">अज</th><th colspan="4">विजा/भज</th><th rowspan="2">विप्र</th><th rowspan="2">ससा</th><th rowspan="2">एकूण</th></tr>
<tr><th>अ</th><th>ब</th><th>क</th><th>ड</th></tr>
<tr><td>मंजुर पदे</td><td colspan="9">एकाकी पद असल्याने आरक्षण नाही.</td></tr>
<tr><td>कार्यरत पदे</td><td colspan="9">०</td></tr>
<tr><td>रिक्त पदे</td><td colspan="9">१</td></tr>
</table>

सेवाजेष्ठतेनुसार उपमुख्य अग्निशमन दल अधिकारी या पदाकरिता Consideration Zone मध्ये येणाया कर्मचायांची यादी खालीलप्रमाणे

**प्रवर्ग :- खुला** **रिक्त पदे :- ०१**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव व हुद्या | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री.गवळी विकास कृष्णराव,फायर ऑफिसर | गवळी इमाजा | एच.एस.सी,एल.एस.जी.डी,सहा. ऑफिसर/स्टेशन ऑफिसर कोर्स जडवाहन परवाना,सिव्हिल डिफेन्स कोर्स,एल.एस.जी.,फायरमन,एमएस सीआयटी,राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय उच्च डिप्लोमा | १६/११/७७ | १९/१२/०१ | |

अ.क्र.१ वर नमुद श्री.गवळी विकास कृष्णराव हे उपमुख्य अग्निशमन दल अधिकारी या पदावर पदोन्नतीने नियुक्ती करिता आवश्यक अर्हता धारण करत असल्याने त्यांना खुल्या गटातुन पदोन्नती देणेबाबत कर्मचारी निवड समितीने शिफारस केली.

**विषय क्रमांक २ -:** स्टेशन ऑफिसर या संवर्गात निम्नश्रेणी सब ऑफिसर या संवर्गातुन पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणे.

**पदोन्नतीचे पदनाम :- स्टेशन ऑफिसर**

वेतनश्रेणी :- ५२००-२०२००+२८०० ग्रेड वेतन (सुधारित वेतन संरचना)

अ) एकुण मंजुर पदे :- ६

ब) भरलेली पदे :- १

क) रिक्त पदे :- ५

एकुण रिक्त पदे :- ५

**पदोन्नतीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव खालिल प्रमाणे..**

१) एस.एस.सी परिक्षा (रसायन शास्त्र व भौतिक शास्त्र) यापैकी एक विषय घेऊन उत्तीर्ण
२) नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज नागपुर येथील किंवा तत्सम मान्यता प्राप्त संस्थेचा फायर ऑफिसर कोर्स उत्तीर्ण
३) जडवाहन चालविण्याचा परवानाधारक/परवाना पुढील ५ वर्षे वैध असावा.

**स्टेशन ऑफिसर या संवर्गात पदोन्नतीकरिता अनुशेष खालिल प्रमाणे...**

| | अजा | अज | विजा/भज | | | | विमाप्र | ससा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | |
| मंजुर पदे | १ | १ | - | - | - | - | - | ४ | ६ |
| कार्यरत पदे | - | १ | - | - | - | - | - | - | १ |
| रिक्त पदे | - | - | १ | - | - | - | - | ४ | ५ |

सेवाजेष्ठतेनुसार स्टेशन ऑफिसर या पदाकरिता Consideration Zone मध्ये १:३ प्रमाणात येणा-या कर्मचा-यांची यादी खालीलप्रमाणे

**प्रवर्ग :- विमुक्त जाती (अ)** **रिक्त पदे :- १**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचायाचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विमुक्त जाती (अ) या प्रवर्गातुन कर्मचारी पदोन्नतीकरिता उपलब्ध नाही. | | | | | | | |

विमुक्त जाती (अ) या प्रवर्गातुन पदोन्नतीकरिता पात्रताधारक कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदरचे पद सरळसेवेव्दारे भरणेत यावे असा समितीने निर्णय घेतला.

**प्रवर्ग :- खुला** **रिक्त पदे :- ४**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री.बैरागी राजेंद्र मुकुंदराव | बैरागी भज-ब | ११ वी पास,राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई येथील कोर्स, सब ऑफिसर कोर्स, जडवाहन परवाना,ना.स.दल कोर्स,ट्रान्सपोर्ट मोटार व्हेई कल परवाना,राष्ट्रीय अग्नि शमन सेवा महाविद्यालय नागपुर यांचेकडील डिप्लोमा, स्टेशन ऑफिसर कोर्स पास | ०४.१०.१९८९ | १८.०८.१९९७ | |

उपरोक्त नमुद केल्यानुसार खुल्या गटातुन पदोन्नतीकरिता ४ पदे उपलब्ध होत आहेत यापैकी निम्नश्रेणी सब ऑफीसर या संवर्गातुन अ.क्र.१ वर नमुद श्री.बैरागी राजेंद्र मुकूंदराव हे एकमेव कर्मचारी कार्यरत असल्याने व ते पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता धारण करत असल्याने त्यांना खुल्या गटातुन स्टेशन ऑफिसर या पदावर पदोन्नती देणे बाबत कर्मचारी निवड समितीने शिफारस केली. तसेच सन १९९७ मध्ये श्री.पंडीत विठ्ठल तिडके यांना अनुसूचित जमातीसाठी राखीव पदावर आदेश क्रमांक ६५१ दि.१८/८/१९९७ अन्वये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेत आलेली असल्याने व उक्त नमुद केल्यानुसार खुल्या गटात सद्या रिक्त पदे उपलब्ध असल्याने त्यांची अनुसुचित जमातीच्या पदावरील पदोन्नती खुला गटात वर्ग करणेत यावी अशी समितीने शिफारस केली.

स्टेशन ऑफीसर या संवर्गात खुल्या गटातुन पदोन्नतीकरिता ४ पदे रिक्त असुन उपरोक्तप्रमाणे २ कर्मचाऱ्यांना खुल्या गटातुन पदोन्नती देणेस समितीने शिफारस केल्याने व निम्नश्रेणी सब ऑफीसर या संवर्गातुन पदोन्नतीकरिता कर्मचारी उपलब्ध नसल्याने रिक्त राहणाऱ्या २ पदांवर सरळसेवेने नियुक्ती करणेत यावी अशी समितीने शिफारस केली.

**विषय क्रमांक ३ -:** सब ऑफीसर या संवर्गात निम्नश्रेणी लिडींग फायरमन या संवर्गातुन पात्र कर्मचायांना पदोन्नती देणे.

**पदोन्नतीचे पदनाम :- सब ऑफीसर**

वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० + २४०० ग्रेड वेतन

अ) एकुण मंजुर पदे :- ६

ब) भरलेली पदे :- १

क) रिक्त पदे :- ५

ड) संभाव्य रिक्त पदे :- १

एकुण रिक्त पदे :- ६

**पदोन्नतीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव खालिलप्रमाणे.**

१) एस.एस.सी परिक्षा (रसायन शास्त्र व भौतिक शास्त्र) यापैकी एक विषय घेऊन उत्तीर्ण.

२) नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज नागपुर येथील किंवा तत्सम मान्यताप्राप्त संस्थेचा सब ऑफीसरचा कोर्स उत्तीर्ण.

३) स्थानिक स्वराज्य संस्था किंवा खाजगी संस्थेत अग्निशमन दल विभागातील ३ वर्षे कामाचा अनुभव

४) जड वाहन चालविण्याचा परवाना.

**सब ऑफीसर या संवर्गात पदोन्नतीकरिता अनुशेष खालिलप्रमाणे..**

| | अजा | अज | विजा/भज | | | | विमाप्र | ससा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | |
| मंजुर पदे | १ | १ | - | - | - | - | - | ४ | ६ |
| कार्यरत पदे | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| रिक्त पदे | १ | १ | - | - | - | - | - | ३ | ५ |
| संभाव्य रिक्त पदे | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| एकुण रिक्त पदे | - | १ | १ | - | - | - | - | ४ | ६ |

सेवाजेष्ठतेनुसार सब ऑफीसर या पदाकरिता लिडींग फायरमन या संवर्गातुन Consideration Zone मध्ये येणाया कर्मचा-यांची यादी खालीलप्रमाणे.

**प्रवर्ग :- अनुसूचित जमाती** **रिक्त पदे :- ०१**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७ | श्री.गायकवाड दिपक भटु, | ठाकुर अज | १० वी पास, फा.फा.कोर्स पास, जड वाहन चालविण्याचा परवाना प्रा.अग्निशमन कोर्स, सब ऑफीसर कोर्स | २०.८.९१ | १८.८.९७ | |
| २ | ८ | श्री.आहिरे जगदिश शांताराम | ठाकुर अज | १२ वी पास, होमगार्ड प्रशि.पास, प्राथ.अग्निशमन प्रशिक्षण मुंबई,सब ऑफिसर कोर्स | २०.८.९१ | १८.८.९७ | |

अ.क्र. १ वर नमुद श्री.गायकवाड दिपक भटु हे सबऑफीसर या पदावर पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण करीत असल्याने त्यांना अनुसुचित जमाती या प्रवर्गातुन पदोन्नती देणे बाबत कर्मचारी निवड समितीने शिफारस केली.

**प्रवर्ग :- विमुक्त जाती/भटक्या जमाती** **रिक्त पदे :- ०१**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | श्री.हिंगमिरे कैलास बाळासाहेब | लिंगायत भ.ज-ब | १० वी पास, | २४.५.८६ | १८.८.९७ | सब आफीसर कोर्स व ज.वा.चालविण्याचा परवाना नाही |
| २ | ६ | श्री.बैरागी संजय कचरदास | बैरागी भ.ज -ब | १२ वी पास, राज्य अग्निशमन कोर्स, सब ऑफिसर कोर्स, जडवाहन परवाना, स्टेशन ऑफिसर ॲन्ड इंन्स्ट्रक्टर कोर्स | ६.१०.८९ | १८.८.९७ | |

अ.क्र.१ वर नमुद श्री.हिंगमिरे हे पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता सब ऑफीसर कोर्स व जड वाहन चालविण्याचा परवाना ही अर्हता धारण करत नसल्याने त्यांना पदोन्नती देता येणार नाही असा समितीने निर्णय घेतला. अ.क्र.२ वर नमुद श्री.बैरागी संजय कचरदास हे सब ऑफिसर पदावर पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण करीत असल्याने त्यांना विमुक्त जाती/भटक्या जमाती या प्रवर्गातुन पदोन्नती देणे बाबत कर्मचारी निवड समितीने शिफारस केली.

**प्रवर्ग :- खुला प्रवर्ग** **रिक्त पदे :- ०४**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १ | श्री.निगळ संपत देवराम | मराठा ससा | एसएससी,एमएससीआयटी | १.६.७९ | १.३.८२ | सब आफीसर कोर्स व ज.वा.चालविण्याचा परवाना नाही |
| २. | २ | श्री.हिंगमिरे कैलास बाळासाहेब | लिंगायत भज.ब | १० वी पास | २४.५.८६ | १८.८.९७ | सब आफीसर कोर्स व ज.वा.चालविण्याचा परवाना नाही |
| ३. | ३ | श्री.भोळे चंद्रकांत नानाजी | महार अजा | १२ वी पास,प्रा.अ. कोर्स, सिव्हील डिफेन्स जड वाहन परवाना,सब ऑफिसर कोर्स,एमएससीआयटी | ६.१०.८९ | १८.८.९७ | |

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | ४ | श्री.जाधव अनिल ऊमाजी | महार अजा | बी.कॉम,म.ई.टंक.३०,प्रा.अ.कोर्स,सब ऑफिसर कोर्स, ट्रान्सपोर्ट मोटार व्हेईक ल, एमएससीआयटी,ट्रेनिंग प्रोग्राम ऑन पलड रेस्क्यु बाय युझिंग मॅकेनाईज्ड इन्प्लॅटटेबल बोटस,ट्रेनिंग प्रोग्राम ऑन सर्च रेस्क्यू, टॅक्टीकल मेडली फायर ड्रील कोर्स, कमर्शियल परेड ॲन्ड व्हेरियस ॲक्टी व्हिटिज,सिव्हील डिफेन्स फायर फायटिंग, | ६.१०.८९ | १८.८.९७ | |
| ५. | ५ | श्री.निकम सुभाष बापुराव | महार अ.जा. | बी.ए.पास, बें.फा.फा. प्रा.अ.प्र.,सब ऑफीसर कोर्स-२००७ | ६.१०.८९ | १८.८.९७ | ज.वा.चालविण्याचा परवाना नाही |
| ६. | ६ | श्री.बैरागी संजय कचरदास | बैरागी भ.ज ब | १२ वी पास, राज्य अग्निशमन कोर्स,मुंबई,सब ऑफीसर कोर्स, लाइट मोटार व्हेइकल (लर्निग), ना.स दल कोर्स,जड वाहन परवाना, स्टेशन ऑफीसर ॲन्ड इन्स्ट्रक्टर कोर्स पास | ६.१०.८९ | १८.८.९७ | विजा/भज प्रवर्गातुन पात्र |
| ७. | ७ | श्री.गायकवाड दिपक भट्ट | ठाकुर अज | १० वी पास, फा.फा.कोर्स पास, जड वाहन चालविण्याचा परवाना प्रा.अग्निशमन कोर्स, सब ऑफीसर कोर्स | २०.८.९१ | १८.८.९७ | अज प्रवर्गातुन पात्र |
| ८. | ८ | श्री.अहिरे जगदीश शांताराम | ठाकुर अज | १२ वी पास,होमगार्ड परीक्षा पास, प्रा.अग्निशमन प्रशिक्षण,मुंबई,सब ऑफीसर कोर्स,जड वाहन परवाना. | २०.८.९१ | १८.८.९७ | |

उपरोक्त नमुद अ.क्र.१,२ व ५ वर नमुद कर्मचारी पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता सब ऑफीसर कोर्स/जडवाहन चालविण्याचा परवाना ही अर्हता धारण करत नसल्याने त्यांना पदोन्नती देता येणार नाही असा समितीने निर्णय घेतला. तसेच अ.क्र.६ वर ७ वर नमुद कर्मचारी यांची मागासवर्गीय अनुशेषाच्या पदांवर पदोन्नतीकरिता शिफारस करण्यात आलेली असल्याने सदर कर्मचारी वगळुन अ.क्र.३,४ व ८ अनुक्रमे श्री.भोळे चंद्रकांत नानाजी, श्री.जाधव अनिल उमाजी व श्री.अहिरे जगदिश शांताराम हे सब ऑफिसर या पदावर पदोन्नतीची आवश्यक अर्हता धारण करीत असल्याने त्यांना खुल्या गटातुन पदोन्नती देणे बाबत कर्मचारी निवड समितीने शिफारस केली. सदर कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्यानंतर खुल्या गटातील १ पद रिक्त राहत असल्याने सदरचे पद सरळसेवेव्दारे भरणेत यावे असा समितीने निर्णय घेतला.

**<u>विषय क्रमांक ४</u> -:** लिडींग फायरमन या संवर्गात निम्नश्रेणी फायरमन या संवर्गातुन पात्र कर्मचायांना पदोन्नती देणे.

**<u>पदोन्नतीचे पदनाम</u>** :- **लिडींग फायरमन**

वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० + २४०० ग्रेड वेतन

अ) एकुण मंजुर पदे :- २०

ब) भरलेली पदे :- ०८

क) रिक्त पदे :- १२

ड) संभाव्य रिक्त पदे :- ०५

एकुण रिक्त पदे :- १७

**पदोन्नतीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव खालिलप्रमाणे.**

१) एस.एस.सी परिक्षा (रसायन शास्त्र व भौतिक शास्त्र) यापैकी एक विषय घेऊन उत्तीर्ण.
२) सरकार मान्य संस्थेचा फायरमन कोर्स उत्तीर्ण.
३) शारिरिक दृष्ट्या तंदुरुस्त.

**लिडींग फायरमन या संवर्गात पदोन्नतीकरिता अनुशेष खालिलप्रमाणे..**

| | अजा | अज | विजा/भज | | | | विमाप्र | ससा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | |
| मंजुर पदे | ३ | २ | १ | - | १ | - | - | १३ | २० |
| कार्यरत पदे | १ | १ | - | - | - | - | - | ६ | ८ |
| रिक्त पदे | २ | १ | १ | - | १ | - | - | ७ | १२ |
| संभाव्य रिक्त पदे | १ | १ | - | - | - | - | - | ३ | ५ |
| एकुण रिक्त पदे | ३ | २ | १ | - | १ | - | - | १० | १७ |

सेवाजेष्ठतेनुसार लिडींग फायरमन या पदाकरिता Consideration Zone मध्ये येणा-या कर्मचा-यांची यादी खालीलप्रमाणे.

**प्रवर्ग :- अनुसूचित जाती** **रिक्त पदे :- ०३**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ७ | श्री.पगारे बाळु सावळीराम | महार अजा | एसएससी पास | २९.१०.८३ | २९.१०.८३ | राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| २. | १३ | श्री.पवार हिरामण वाघुजी | महार अजा | ७ वी पास, अग्निशमन प्राथमिक पाठय.मुंबई, हिंदी उत्तमा परिक्षा पास | १.५.८४ | २७.८.९१ | एसएससी उत्तीर्ण नाही |
| ३. | १७ | श्री.पगारे पंडीत रामभाऊ,फायरमन | महार अजा | १२ वी पास,इ म. टंक.,राज्य अग्निशमन प्रशिक्षण मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| ४. | १८ | श्री.डांगळे विलास मोतीराम | महार अजा | १० वी पास,प्रथोमपचार कोर्स,राज्य अग्निशमन प्रशिक्षण मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| ५. | २० | श्री.हिरे संजिव रघुनाथ | महार अजा | एफ.वाय.बी.ए, फायर फायटिंग नागरी संरक्षण अग्निशमन कोर्स मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| ६. | २१ | श्री.भालेराव सोमनाथ दयाराम | महार अजा | १० वी पास, आयटीआय डिझेल मॅकेनिक कोर्स, नागरी संरक्षण दल अग्निशमन दल कोर्स मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| ७. | २२ | श्री.पगारे संजय सदाशिव | महार अजा | बीए,एलएसजीडी,नागरी संरक्षण दल कोर्स, राज्य अग्निशमन कोर्स मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| ८. | २३ | श्री.दोंदे दिलीप विठ्ठल | महार अजा | एचएससी, बेसिक फायर फायटिंग कोर्स,हाऊस फायर वॉर्डन कोर्स पास, राज्य अग्निशमन प्रशिक्षण कोर्स | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| ९. | २४ | श्री.निळे सुनिल शिवराम | महार अजा | बी कॉम, सिव्हील डिफेन्स, हाऊस फायर फस्टएड, वार्डन कोर्स पास. | २०.९.९४ | २०.९.९४ | |

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०. | २५ | श्री.चंद्रमोरे देविदास अंकुश | महार अजा | ११ वी ,सब ऑफिसर कोर्स,जडवाहन परवाना,राज्य अग्निशमन कोर्स | २०.९.९४ | २०.९.९४ | |

उपरोक्त नमुद अ.क्र.१,२,५,६ वर नमुद कर्मचारी पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता एसएससी/राज्य अग्निशमन कोर्स ही अर्हता धारण करत नसल्याने त्यांना पदोन्नती देता येणार नाही असा समितीने निर्णय घेतला.अ.क्र.३,४ व ७ वर नमुद कर्मचारी अनुक्रमे श्री.पगारे पंडीत रामभाऊ, श्री.डांगळे विलास मोतीराम व श्री.पगारे संजय सदाशिव हे लिडींग फायरमन या पदावर पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता धारण करत असल्याने त्यांना अनुसूचित जाती या प्रवर्गातुन पदोन्नती देणे बाबत कर्मचारी निवड समितीने शिफारस केली.

**प्रवर्ग :- अनुसूचित जमाती** **रिक्त पदे :- ०२**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५३ | श्री.मतवाड शिवाजी गित,फायरमन | पावरा अज | १२ वी,ना.सं.दल कोर्स,राज्य अग्निशमन प्रशिक्षण मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| २. | ६१ | श्री.मधे मोहन नारायण,फायरमन | म.कोळी अज | १० वी, ना.स.दल बेसिक ट्रेनिंग फुल फस्टएड फायर फायटिंग कोर्स, राज्य अग्निशमन प्रशिक्षण मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| ३. | ६७ | श्री.दाते रमेश नामदेव,फायरमन | म.कोळी अज | १२ वी पास,म.इं.टंक. ३०, प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |

अ.क्र.१ व २ वर नमुद कर्मचारी अनुक्रमे श्री.मतवाड शिवाजी गित व श्री.मधे मोहन नारायण हे लिडींग फायरमन या पदावर पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता धारण करत असल्याने त्यांना अनुसुचित जमाती या प्रवर्गातुन पदोन्नती देणे बाबत कर्मचारी निवड समितीने शिफारस केली.

**प्रवर्ग :- विमुक्त जाती (अ)** **रिक्त पदे :- ०१**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ३९ | श्री.परदेशी प्रदिप बाबुसिंग,फायरमन | परदेशी भामटा विजा-अ | बीए,म.इ.टंक.,ना.सं.दल कोर्स, प्राथमिक प्रशिक्षण फायर फायटिंग, राज्य अग्निशमन प्रशिक्षण मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |

अ.क्र.१ वर नमुद श्री.परदेशी प्रदिप बाबुसिंग हे लिडींग फायरमन या पदावर पदोन्नतीकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करत असल्याने त्यांना विमुक्त जाती (अ) या प्रवर्गातुन पदोन्नती देणे बाबत कर्मचारी निवड समितीने शिफारस केली.

**प्रवर्ग :- विमुक्त जाती/भटक्या जमाती -क** **रिक्त पदे :- ०१**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५८ | श्री.गाडे दत्तात्रय रामभाऊ,फायरमन | धनगर भ.ज.-क | बीएससी,ना.सं.दल बेसिक ट्रेनिंग ,राज्य अग्निशमन प्रशिक्षण मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| २. | १०९ | श्री.काळे रामदास रघुनाथ,फायरमन | धनगर भ.ज.क | एम.ए.,बी.एड.,राज्य अग्निशमन कोर्स | २०.९.९४ | २०.९.९४ | |

अ.क्र.१ श्री.गाडे दत्तात्रय रामभाऊ हे लिडींग फायरमन या पदावर पदोन्नतीकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्याने त्यांना विमुक्त जाती/भटक्या जमाती - क या प्रवर्गातुन पदोन्नती देणे बाबत कर्मचारी निवड समितीने शिफारस केली.

**प्रवर्ग :-खुला प्रवर्ग** **रिक्त पदे :- १०**

| अ. क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १ | ताजनपुरे विष्णु काशिनाथ | मराठा स सा | ७ वी पास | २.२.८१ | २.२.८१ | एसएससी उत्तीर्ण नाही राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| २. | २ | दातीर मुरलीधर बाळु | मराठा स सा | ९ वी पास,राज्य अग्निशमन कोर्स | १.१०.८१ | १.१०.८१ | एसएससी उत्तीर्ण नाही |
| ३. | ३ | निर्वाण विलास मोहनलाल | न्हावी इमाजा | एसएससी पास,ना.सं.दल कार्स | १.१०.८१ | १.१०.८१ | राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| ४. | ४ | मानकर रामभाऊ कारभारी | वंजारी भज.ड | १० वी नापास | १८.२.८२ | १८.२.८२ | राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| ५. | ५ | दिवटे भास्कर दगुजी | तेली इमाजा | ९ वी पास | ३.५.८२ | ३.५.८२ | एसएससी उत्तीर्ण नाही राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| ६. | ६ | गाडेकर ज्ञानेश्वर विष्णु | माळी इमाजा | ६ वी पास | ९.८.८२ | ९.८.८२ | एसएससी उत्तीर्ण नाही राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| ७. | ७ | पगारे बाळु सावळीराम | महार अजा | एस.एस.सी पास | २९.१०.८३ | २९.१०.८३ | राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| ८. | ८ | लांडगे ऊमाकांत हरीभाऊ | मराठा ससा | ९ वी पास | १६.७.७३ | १.४.८७ | एसएससी उत्तीर्ण नाही राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| ९. | ९ | देवरे दौलत महादू | मराठा ससा | ७ वी पास,जनरल ट्रेनिंग कोर्स मुंबई | २९.१०.८३ | १.४.८७ | एसएससी उत्तीर्ण नाही राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| १०. | १० | जाधव दिपक शिवराम | मराठा ससा | नॉन एसएससी राज्य अग्नि प्र.मुंबई | २९.१०.८३ | १.४.८७ | एसएससी उत्तीर्ण नाही |
| ११. | ११ | पठाण अफझलखान युसुफखान | मुस्लीम ससा | ८ वी पास | २९.१०.८३ | १.४.८७ | एसएससी उत्तीर्ण नाही राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| १२. | १२ | जाधव दिपक नाना | क्षत्रिय ससा | नॉन एसएससी | २९.१०.८३ | १.४.८७ | एसएससी उत्तीर्ण नाही राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| १३. | १३ | पवार हिरामण वाघुजी | महार अजा | ७ वी पास,अग्नि.प्र.पाठ्य मुंबई,हिंदी उत्तमा परीक्षा पास | १.५.८४ | २७.८.९१ | एसएससी उत्तीर्ण नाही |
| १४. | १४ | गांगुर्डे नाना सहादराव | मराठा ससा | ७ वी पास, प्राथ.अग्नी कोर्स पास, सिव्हील डिफेन्स कोर्स बेसिक,हिंदी उत्तमा परीक्षा पास | २३.१.८४ | २८.८.९१ | एसएससी उत्तीर्ण नाही |
| १५. | १५ | कानडे संजय जगन्नाथ | कलाल इमाजा | १० वी पास, अग्निशमन प्रशि.पाठयक्रम मुंबई, ट्रान्सपोर्ट मोटार व्हेईकल | २६.६.९२ | २०.९.९४ | |
| १६. | १६ | गायकवाड शांताराम कचरु | मराठा ससा | १० वी पास,राज्य अग्निशमन प्रशि.कोर्स मुंबई | २२.३.९३ | २०.९.९४ | |

| अ. क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७. | १७ | पगारे पंडीत रामभाऊ | महार अजा | १२ वी,ना.सं अग्निशमन इ.म टंक,राज्य अग्निशमन प्रशि.मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | अजा प्रवर्गातुन पात्र |
| १८. | १८ | डांगळे विलास मोतीराम | महार अजा | १० वी पास,प्रथोपचार कोर्स पास,राज्य अग्नि .प्र.मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | अजा प्रवर्गातुन पात्र |
| १९. | १९ | औसरकर गजेंद्र माधवराव | शिंपी इमाजा | १० वी प्रशि.महाविद्यालय अव्हेरेज कोर्स,राज्य अग्नि .प्र.मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| २०. | २० | हिरे संजिव रघुनाथ | महार अजा | एफवायबीए,नागरी सं.बेसिक कोर्स,बेसिक फायर फायटींग कोर्स नागरी संरक्षणदल.. | २०.९.९४ | २०.९.९४ | राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| २१. | २१ | भालेराव सोमनाथ दयाराम | महार अजा | १० वी,आयटीआय डिझेल मॅकेनिक कोर्स,ना.स.दल अग्निशामन कोर्स,मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| २२. | २२ | पगारे संजय सदाशिव | महार अजा | बी.ए,एलएसजीडी,ना.स.दल कोर्स,राज्य अग्निशमन प्रशिक्षण,मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | अजा प्रवर्गातुन पात्र |
| २३. | २३ | दोंदे दिलीप विठ्ठल | महार अजा | एचएससी,बेसिक फायर फायटिंग,हाऊस फायर वॉर्डन कोर्स पास,राज्य अग्निशमन प्रशिक्षण,मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| २४. | २४ | निळे सुनिल शिवराम | महार अजा | बी.कॉम,सिव्हील डिफेन्स, हाऊस फायर, फस्टएड, वॉर्डन ना.स.दल कोर्स | २०.९.९४ | २०.९.९४ | राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| २५. | २५ | चंद्रमोरे देविदास अंकुश | महार अजा | ११ वी,राज्य अग्निशमन प्रशिक्षण मुंबई,सब ऑफीसर कोर्स,जडवाहन परवाना | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| २६. | २६ | पोरजे अर्जुन हरी | मराठा ससा | १२ वी पास,राज्य अग्निशमन प्रशिक्षण,मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| २७. | २७ | जाधव राजेंद्र बाबुराव | महार अजा | बी.ए पास,अग्निशमन वार्डन कोर्स,राज्य अग्निशमन कोर्स प्रशिक्षण मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| २८. | २८ | कुलकर्णी हेमंतकुमार स. | ब्राम्हण ससा | बी.कॉम,ना.स.फुल फस्टएड, बेसिक हाऊस फायर परेड वॉर्डन कोर्स, | २०.९.९४ | २०.९.९४ | राज्य अग्निशमन प्रशिक्षण नाही |
| २९. | २९ | लाड रविंद्र अमृत | खाटीक अजा | १० वी पास,ना.स.हाय ॲव्हेरेज सिव्हील डिफेन्स कोर्स,राज्य अग्निशमन प्रशिक्षण कोर्स, मुंबई, जडवाहन परवाना | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| ३०. | ३० | राऊत श्याम दौलत | परीट इमाजा | बी.कॉम,ना.सं.अग्नि प्राथ. कोर्स,हाय ॲव्हेरेज,राज्य अग्निशमन प्रशिक्षण,मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |
| ३१. | ३१ | .शेख इकबाल कासम | मुस्लीम ससा | बी.कॉम,ना.सं.हायॲव्हेरेज बेसिक कोर्स पास, राज्य अग्निशमन प्रशिक्षण,मुंबई | २०.९.९४ | २०.९.९४ | |

अ.क.१,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,२०,२१,२४,२८ वर नमुद कर्मचारी पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हतेपैकी एस.एस.सी.परीक्षा/राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,मुंबई या संस्थेचा फायरमन कोर्स ही अर्हता धारण करीत नसल्याने त्यांना पदोन्नती देता येणार नाही असा समितीने निर्णय घेतला.तसेच अ.क्र.१७,१८,२२ यांना अनुसूचित जाती या प्रवर्गातुन पदोन्नती देणेकरिता शिफारस करण्यात आलेली असल्याने सदर कर्मचारी वगळुन अ.क्र.१५,१६,१९,२३,२५,२६,२७,२९,३० व ३१ अनुक्रमे श्री.कानडे संजय जगन्नाथ, श्री.गायकवाड शांताराम कचरु, श्री.औसरकर गजेंद्र माधवराव, श्री.दोंदे दिलीप विठ्ठल, श्री.चंद्रमोरे देविदास अंकुश, श्री.पोरजे अर्जुन हरी, श्री.जाधव राजेंद्र बाबुराव, श्री.लाड रविंद्र अमृत, श्री.राऊत शाम दौलत व श्री.शेख इकबाल कासम हे कर्मचारी लिडींग फायरमन या पदावर पदोन्नतीकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्याने त्यांना खुल्या गटातुन पदोन्नती देणेस समितीने शिफारस केली.

उपरोक्त पदोन्नतीसाठी पात्र कर्मचाऱ्यांपैकी जे कर्मचारी लिपीक पदासाठी पात्र आहेत त्यांना सरळसेवा भरतीनंतर लिपीक पदी पदोन्नती देणेबाबत निर्णय झालेला असल्याने अशी पदे रिक्त समजून सरळसेवेने भरणेत यावीत अशी समितीने शिफारस केली.

याप्रमाणे उपरोक्त विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. कार्यपत्रिकेवरील विषय संपल्याने समितीचे कामकाज संपल्याचे मा. समिती अध्यक्ष यांनी जाहीर केले

१. मा. आयुक्त सो., :-

२. उपआयुक्त (प्र.) :-

३. मुख्य अग्निशामक दल अधिकारी :-

४. मुख्यलेखापरीक्षक :-

५. क्रिडा अधिकारी तथा मागासवर्गीय अधिकारी :-

६. कामगार कल्याण अधिकारी :-